Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# मनोहर तल्हार यांच्या 'नि:संग' या कथासंग्रहाचा आशय वेध

**अश्विनी राजेंद्र सातपुडके,** संशोधक विद्यार्थी, स्नातकोत्तर मराठी विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर (महाराष्ट्र)

**डॉ. गणेश भीमराव मोहोड**, संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, मराठी व कला विभाग, नारायण काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा (घाडगे), जि. वर्धा (महाराष्ट्र)

## गोषवारा

मनोहर तल्हार हे साठोत्तरी काळातील एक महत्त्वाचे कथाकार होते. त्यांच्या समकालीन कथाकार म्हणून आपल्याला उद्धव शेळके, सखा कलाल, यादव, शंकरराव खरात, जी. ए. चित्रे, खानोलकर, कमल देसाई, विद्याधर पुंडलिक, शरदचंद्र चिरमुले, विजय तेंडुलकर आणि विजया राजाध्यक्ष ही महत्त्वाची नावे घेता येतात. विविध विषय घेऊन नवीन जोमाने व नवीन प्रेरणेने तत्कालीन कथाकार आपले कथा लेखन करत होते. मनोहर तल्हार यांनी समाज मनाबरोबरच व्यक्ती मनाचाही धागा अचूक हेरून आपले कथालेखन केले. त्यांनी जवळजवळ १५० च्या वर कथा लेखन केले आहे. कथालेखनाचा हा आवाका पाहता त्यांनी विविध विषय घेऊन कथालेखन केले हे स्पष्टच आहे.

मनोहर तल्हार मानवी स्वभावाचे विविध पैलू आपल्या कथेमधून मांडतात. मानवी वर्तन आणि क्रियाकल्प याचा संबंध मनोहर तल्हार योग्य प्रकारे रेखाटतात. विविध स्वभाव वैशिष्ट्यांची विविध ढंगांची व्यक्तिरेखा त्यांच्या कथांमधून आपल्याला पाहायला मिळते. त्यांची अगदी हुबेहूब वर्णन मनोहर तल्हार आपल्या कथा लेखनात करतात. कथा लेखनातील ते अगदी साध्या सोप्या भाषेचा वापर करतात. मनोहर तल्हार यांच्या अनेक कथांमध्ये मित्रांचे त्यांच्या मैत्रीचे वर्णन येते. त्यांच्या कथांमध्ये दिन, दुबळे ,गरीब,अज्ञानी, अशिक्षित, बेरोजगार त्याबरोबरच सुशिक्षित, ज्ञानी, नोकरी करणारे, पांढरपेशी, श्रीमंत, उच्चभ्रू या विविध स्तरातील व्यक्तीचित्रण येते. परिस्थितीने कावुन गेलेली, लाचार, हतबल झालेली असंख्य व्यक्ती त्यांच्या कथांमधून येत असली तरीही ते स्वाभिमानाने ताठ उभी राहून परिस्थितीशी दोन हात करताना दिसतात. मनोहर तल्हार आपल्या कथालेखनात धक्का तंत्राचा वापर करतात. त्यांच्या बहुतेक कथांचा शेवट हा वाचक मनाला सुन्न करणारा असतो. त्यांच्या कथा वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवतात. त्यांच्या कथांचा शेवट हा शोकात्मक असला तरीही त्यांच्या कथा वाचनातून वाचकाला जीवन जगण्यास प्रोत्साहन मिळते. मानवी स्वभावाचे विविध रंग व तरंग समजण्यास त्यांच्या कथांमधून मदत होते.

**बीजशब्द:** समीक्षा, हास्यविनोद, निवेदक, ब्लॉक, उबग, तत्त्वज्ञान, भ्रमिष्ट, अभिलाषा, दिनचर्या, विद्रोह, विकृती, राक्षसी प्रवृत्ती, अक्षम, घटस्फोट, मोहित, भावविवश, राजकारण, छळ, पश्चाताप, हृदयदारक, वाताहात, सहानुभूती, मनीऑर्डर, उदात्त, मनकल्लोळ.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024
Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

## प्रस्तावना

मनोहर तल्हार यांचा जन्म १४ ऑक्टोंबर १९३२ मध्ये अमरावती येथे झाला. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण शिवाजी विद्यालय अमरावती येथून केले. त्यानंतर त्यांनी विक्रीकर खात्यात नोकरीला लागले. त्यांनी १९५० पासून आपल्या साहित्य लेखनाला सुरुवात केली. त्यांनी आपल्या साहित्य लेखनाच्या अगदी सुरुवातीला म्हणजेच १९५० ते १९५४ या काळात चित्रपट समीक्षा लेखन केले. त्यानंतर त्यांनी कथालेखन केले. कथा लेखनाबरोबरच त्यांनी कादंबरी लेखनही केले आणि नंतर शेवटी ते कविता लेखनाकडे वळले. त्यांनी एकूण पाच कादंबऱ्या, सात कथासंग्रह आणि एक कवितासंग्रह लिहिला आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह 'बुढीच खाटलं' (१९५८) हा आहे. त्यानंतर त्यांनी आपली 'माणूस' ही कादंबरी १९६३ मध्ये प्रसिद्ध केली आणि ती तुफान गाजली. मराठी साहित्य रसिकांच्या मनात या कादंबरीने घर करून घेतले.

मनोहर तल्हार यांनी एकूण सात कथासंग्रह प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये पहिला 'बुढीच खाटलं' हा आहे. त्यानंतर 'तोलरेघ' (१९६५), 'गोरीमोरी' (१९६६) 'नि:संग' (१९७८) यामध्ये आठ कथांचा संग्रह आहे, 'कॅन्सल' (१९९३) या कथासंग्रहामध्ये पंधरा कथांचा संग्रह आहे, 'दुजा शोक वाहे' (२०००) यामध्येही पंधरा कथांचा संग्रह आहे, 'दुरान्वय' (२००६) या कथासंग्रहा मध्ये चवदा कथांचा संग्रह आहे. याप्रमाणे त्यांचा कथांचा संग्रह आहे. त्याबरोबरच त्यांनी दीडशे च्या वर कथांचे लेखन केले आहे. त्या कथा त्यांनी वेगवेगळ्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध केल्या आहे. मनोहर तल्हार यांचे कथालेखन पाहता त्यांनी विपुल प्रमाणात कथा लेखन केले आहे हे मान्य करावेच लागेल. मनोहर तल्हार यांनी आपल्या कथा लेखनाने मराठी कथा वाङ् मय क्षेत्र समृद्ध करण्यास हातभार लावला आहे.

## 'नि:संग' कथासंग्रह

नि:संग हा मनोहर तल्हार यांचा चौथा कथासंग्रह आहे. तो १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला होता. यामध्ये नि:संग, एक आँख का पंछी, पुनर्भेट, धीट, अथांग, कोलमडलेला आणि उद्ध्वस्त याप्रकारे एकूण आठ कथा आहे.

कथासंग्रहाच्या नावाप्रमाणेच त्यांची या कथासंग्रहातील पहिली कथा 'नि:संग' हीच आहे. प्रस्तुत कथा ही तीन मित्रांबद्दल येते. हे तीनही मित्र एकाच शासकीय कार्यालयात कारकून म्हणून काम करतात आणि नोकरीमुळे अमरावती, नागपूर या परिसरात एकत्र वास्तव्यास येतात. या तीन मित्रांच्या हलक्याफुलक्या हास्य विनोदाची ही कथा असली तरी यामध्ये मुख्य पात्र प्रकाश झोत नावाचे आहे. यामध्ये हे पात्र आपली हौस पूर्ण करण्यासाठी विविध खोटे कारणे देऊन लोकांकडून कर्ज घेताना दिसते. या कथेत अगदी सुरुवातीपासूनच हलकेफुलके हास्यविनोद बघायला मिळतात. कथेतील देशपांडे नावाचे पात्र हेच



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

कथेचा निवेदक आहे. अगदी सुरुवातीलाच हा आपल्याला पात्रांची, प्रसंगाची आणि पार्श्वभूमीची माहिती करून देतो. यामध्ये नागपूर वरून अमरावतीला प्रकाश झोत कारकून म्हणून बदली होऊन येतो. अडीचशे रुपये पगार असताना शंभर रुपयांच्या भाड्याच्या ब्लॉकमध्ये राहतो. प्रस्तुत व्यक्तीरेखा ही बिनधास्त वर्तन करणारी, हौशी स्वरूपाची, खाण्याची, फिरण्याची शौकीन या प्रकारची अशी आहे. आपल्या नोकरीच्या पगारात आपली शौक पूर्ण होत नसल्यामुळे तो सर्वांकडून खोटे कारणे देऊन कर्ज घेताना दिसतो आणि त्या कर्जाच्या पैशातून तू आपले विविध शौक पूर्ण करतो. त्याला चांगल्या राहणीमानाची आवड आहे. सिनेमाचे वेळ त्याला आहे.सिनेमातील व्यक्तींप्रमाणे राहावे त्याप्रमाणे वर्तन करावे अशी त्याची इच्छा आहे. लोकांकडून पैसे उकळण्यासाठी तो आपली आजी मेली आहे असे खोटं सांगून लोकांकडून तीन वेळा पैसे घेतो.

या कथेतील प्रकाश झोत हे पात्र अतिशय हुशार आहे. तो लोकांचे स्वभाव वैशिष्ट्ये ओळखून त्या प्रमाणे आपले वर्तन करतो. लोकांकडून फायदा करून घेण्यासाठी तो लोकांच्या स्वभावाप्रमाणे आपले वर्तन बदलतो. यातीलच एक उदाहरण म्हणजे कथेतील हुकूमतराय नावाचे सिंधी पात्र. हा एक हॉटेल व्यवसायिक आहे. तो सिंधी असल्या कारणाने प्रकाश झोत त्याच्याशी सिंधी भाषेमध्ये बोलून जवळीक साधतो. त्याबरोबरच त्याच्या खानावळीमध्ये वाढणाऱ्या पोराला पटवून म्हणजेच पिक्चर दाखवायला नेऊन आपल्याला पाहिजे ते जेवण त्याच्या हॉटेलतून करून घेऊन बिल मात्र कमी पैशाच करून घेतो. तसेच त्या हॉटेलमध्ये दोनशे रुपयाची उधारी करून ठेवतो. त्याला दुसऱ्यांकडून कर्ज घेऊन ते परत न करण्याची सवय आहे. तो ज्या ठिकाणी भाड्यानी राहतो तिथे चार महिन्याचे घर भाडे थकीत ठेवून घर मालकाला न सांगता आपले घर खाली करून पसार होतो. आणि जेव्हा घर मालक घर भाडे मागतो तेव्हा तो सरळ कोर्टात जा म्हणून उत्तर देतो.

प्रकाश झोत याला मुंबई, आग्रा, अजिंठा आणि वेरूळ या ठिकाणी आपल्या बायको आणि मुलांसह विमानाने फिरायचे असते आणि त्याप्रमाणे तो आपली इच्छा पूर्णही करून घेतो त्याकरिता तो आपल्या बायकोचे दागिने विकतो. शेवटी संसाराची उबग आल्याने आणि फिरण्याची आवड असल्याने तो एका रात्री साधू लोकांच्या घोळक्यात मिसळून कुणालाही न सांगता घर सोडून जातो. दोन वर्ष संपूर्ण हिंदुस्तान फिरुन परत येतो. साधूच्या वेशांमध्ये येऊन तो जीवनाचे तत्त्वज्ञान सांगू लागतो. त्याच्या परतण्याची वाट पाहत असणारी त्याची पत्नी त्याच्यामुळे भ्रमिष्ट होते आणि मरण पावते. आपल्यामुळे आपल्या पत्नीवर अशी वेळ आली या विचाराने तोही वेडा होतो. रस्त्याने हातवारे करत, बडबड करत तो फिरत असतो.

या प्रकारे प्रस्तुत कथेमध्ये मनोहर तल्हार यांनी प्रकाश झोत या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून एक हुशार, तल्लक, ज्ञानी आणि तत्त्वज्ञानी व्यक्ती आपल्यापुढे उभी केली आहे. मानसातील स्वभाव वैशिष्टे अगदी योग्य प्रकारे हेरण्याचे कौशल्य त्याच्यात आहे. परंतु या गुणांचा चांगला वापर करण्याच्या विपरीत तो त्याचा



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

दुरुपयोग करून घेतो. खोटे जीवन जगण्याच्या आशेमागे तो लागतो. चित्रपटातील आभासी जीवनाची अभिलाषा त्याला आहे. त्याप्रमाणेच तो एका आभासी दुनियेत जगताना दिसतो.तो आपली वास्तविकता स्वीकारायला तयार नाही. या प्रकारच्या प्रवृत्तीतून तो आपली, आपल्या पत्नीची आणि पर्यायाने आपल्या संपूर्ण कुटुंबाची हेळसांड करून घेतो. स्वतःची दयनीय अवस्था करून घेतो.

मनोहर तल्हार यांच्या 'नि:संग' या कथासंग्रहातील दुसरी कथा म्हणजे 'एक आँख का पंछी' ही होय. प्रस्तुत कथेच्या नावाप्रमाणेच कथेतील पात्र हे एका डोळ्याने अंध आहे. लहानपणी झालेल्या एका अपघातामध्ये त्याला आपला एक डोळा गमवावा लागतो. एका डोळ्याने अंध असल्यामुळे त्याला कुठलेही काम किंवा नोकरी मिळत नाही. घरात त्याला विचारणारे, त्याची काळजी घेणारे कोणीही नसल्यामुळे त्याबरोबरच घर लहान असल्यामुळे घरात राहायची सोय होत नसल्याने तो इकडे तिकडे रात्रभर भटकत असतो. मिळेल ते काम करतो आणि आपले पोट भरतो. जागा मिळेल त्या ठिकाणी झोपून जातो. या प्रकारची त्याची दिनचर्या आहे. आपल्याला एक डोळा नसल्यामुळे आपल्यावर ही परिस्थिती आली आहे असे त्याला वारंवार वाटते. त्याकरिता तो आपल्या नशिबाला दोष देतो. त्याच्या वागण्या बोलण्यात आणि वावरण्यात एक प्रकारचा विद्रोह आहे. तो अंध असल्यामुळे त्याचे लग्न होत नाही. आपल्या भावाप्रमाणे आपलेही लग्न व्हावे आपल्याही पत्नीने आपली काळजी घ्यावी या प्रकारची अभिलाषा तो बाळगून आहे. परंतु तसे होत नाही त्याला त्याचा जोडीदार मिळत नाही. त्यामुळे त्याच्या मनात विकृती निर्माण होते. तो आपल्या बहिणीला आणि वहिनीला वेगळया नजरेने बघायला लागतो. त्याच्यातील या प्रकारचा बदल हा त्याला स्वतःलाच नकोसा असतो. परंतु त्याच्यातील विकृती त्याला स्वस्थ बसू देत नाही. एके दिवशी दुर्गापूजामध्ये रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तो एका मुलीला छेडतो. प्रसंगी पोलिसांचा मारही खातो. परंतु स्त्री स्पर्शाने सुखावलेला त्याच्या मनाला याचा काहीही परिणाम होत नाही. या प्रकारची राक्षसी प्रवृत्ती त्याच्या मध्ये निर्माण होते आणि परिणामी तो वैशालयातही जायला तयार होतो. परंतु तिथेही पैसे नसल्यामुळे त्याची फजिती होऊन त्याला परतावे लागते. याप्रकारे एका अंध अक्षम व्यक्तीची ही कथा आहे तो आपल्या विकृतीला कशाप्रकारे बळी पडतो याचे वर्णन यात आहे.

मनोहर तल्हार यांच्या नि:संग या कथासंग्रहातील तिसरी कथा म्हणजे 'पुनर्भेट' ही होय. यामध्ये घटस्फोट झाल्यानंतर पुन्हा एकदा चुकून भेटणाऱ्या एका दाम्पत्यांची ही कथा आहे. या कथेतील वसुधा ही आपल्या पतीने दुसऱ्या मुलीवर प्रेम केल्याने ती आपल्या पतीकडून घटस्पोट घेते. घटस्फोट झाल्यानंतर तो त्या मुलीशी लग्न करतो. त्यांना एक मुलगा जन्माला येतो त्याचे नाव ते रामू असे ठेवतात. काही काळाने त्याच्या दुसऱ्या पत्नीचे अपघाती निधन होते. त्यानंतर तो आपले उदास, निरुत्साही जीवन जगत असतो यादरम्यान त्याला आपल्या पत्नीची वसुधाची वारंवार आठवण येत असते. त्याच्या पत्नीलाही त्याची कमी



Copyright © | JET Network, All Rights Reserved

आपल्या आयुष्यात जाणवत असते. आणि अशातच त्यांची चुकून एकदा भेट होते. प्रत्यक्ष सामोर भेटल्यानंतर काय बोलावे, काय करावे याचे भान ते दोघेही विसरून जातात. दोघांच्याही मनात अस्वस्थता जाणवते. काही काळ औपचारिकता पार पाडल्यानंतर ते एकमेकांची विचारपूस करतात. दोघेही नोकरी करीत असतात. दोघेही आपापली जबाबदारी पार पाडत असतात परंतु हे करीत असताना स्वतःची होणारे हेडसांड त्यांना जाणवते त्याबरोबरच आपल्या आयुष्यातील आपल्या जोडीदाराची कमतरताही त्यांना जाणवते. त्या दोघांचेही एकमेकांवर जीवापाड प्रेम असते. त्यामुळे परत एकदा भेटल्यानंतर एकमेकांच्या आयुष्यातील आपले महत्त्व ओळखून ते पुन्हा एकदा एकत्र येण्याचा निर्णय घेतात. ते पुन्हा एकदा लग्न करण्याचा निर्णय घेतात. प्रस्तुत कथेमध्ये सुशिक्षित आधुनिक स्त्री चित्रण असले तरीही ती आपल्या पतीशी एकनिष्ठ आहे, संस्कृती जपणारी आहे, आपल्या पतीवर प्रेम करणारी आहे, त्याचबरोबर त्याला त्याच्या चुकीबद्दल माफ करून परत एकदा त्याचा स्वीकार करणाऱ्या पत्नीचे वर्णन या कथेमध्ये येते. प्रस्तुत कथेमध्ये घटस्फोट घेऊनही ती पत्नी आपल्या पतीच्या नावाचे मंगळसूत्र आपल्या गळयात घालताना दिसते. प्रस्तुत कथेमध्ये सुशिक्षित पांढरपेशी नीटनेटके जीवन वर्णिले आहे.

मनोहर तल्हार यांच्या 'नि:संग' या कथासंग्रहातील चौथी कथा म्हणजे 'धीट' ही होय. एका प्रेमी युगलाची ही कथा आहे. एकमेकांना भेटण्यासाठी व्याकूळ झालेले हे प्रेमी युगल आहे. भर पावसामध्ये निमा नावाचे पात्र आपल्या प्रियकराला भेटायला येते. त्यांच्या वागण्या बोलण्यामधून त्यांना एकमेकांबद्दल वाटणारी आपुलकी ही स्पष्ट होते. निमा ही त्याची शाळेतील विद्यार्थिनी असते परंतु वयानुसार मोठी झाल्यावर ती त्याची प्रियसी होते. कामानिमित्त तो जेव्हा येतो तेव्हाच त्यांची भेट होत असते. ते एकमेकांना पत्रव्यवहार करतात. पत्र हेच त्यांचे संपर्काचे साधन असते. परंतु हे पत्र निमाच्या कुटुंबीयांच्या हाती लागते आणि त्यांच्या प्रेमाबद्दल सर्व माहिती तिच्या कुटुंबीयांना होते. त्यामुळे निमाला तिच्या आईकडून याबाबतीत प्रचंड छड सहन करावा लागतो. तिला आपल्या कुटुंबाकडून, आईकडून खूप काही ऐकून घ्यावे लागते. तिला आपल्या कुटुंबाच्या विरोधाला सामोरे जावे लागते. परंतु यामध्ये निमाचे वडील तिची साथ देतात आणि तिला धीट होण्यासाठी मार्गदर्शन करतात. निमा शिक्षणासाठी हॉस्टेलवर असताना तो तिला एकदा भेटायला येतो. त्यावेळेस ती आपल्या हॉस्टेलमध्ये आपल्याला आपला होणारा नवरा भेटायला येणार आहे असे जाहीर करते. आणि नंतर ती जेव्हा त्याला भेटते तेव्हा ती त्याला स्पष्ट लग्न करण्यासाठी विचारते. परंतु एकाएकी लग्नाचा निर्णय घेताना त्याला थोडा प्रश्न पडतो. तो सारासार विचार करायला पाहतो. परंतु निमा धीटपणे आपला निर्णय सांगते आणि आपल्या निर्णयावर ठाम राहते. ती घरून येताना आपल्या घरी सांगून येते की ती या मुलाशी लग्न करणार आहे आणि ती त्याबद्दल त्याला सर्व सांगते. तिच्या या धीट स्वभावावर तो मोहित होतो. त्यालाही तिच्याशी लग्न करायचे असते. आणि ते दोघेही लग्न करायचे निश्चित करतात. ते दोघेही



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

समाजाची परवा न करता लग्नाचा निर्णय घेतात आणि हॉस्टेल मधून निमाचे सामान आणायसाठी निघतात. या प्रकारे एका साधारण मुलीच्या धीटपणे घेतलेल्या निर्णयाचे वर्णन या कथेमध्ये केलेले आहे.

यानंतरची कथा म्हणजे 'आधार' ही होय. ही एक विवाहित जोडप्यांची कथा आहे. प्रस्तुत कथेमध्ये पत्नी वासुदधाच्या आईला पोटाचा त्रास असतो. तिच्या पोटामध्ये पाणी होते आणि या बिमारीमुळे वसुधाच्या आईचे निधन होते. त्यामुळे ती आपल्या वडिलांना सांभाळण्यासाठी आपल्या वडिलांच्या घरी राहते. तिचा पती आपल्या एका मुलासह आपल्या घरी असतो. आपल्या पत्नीला भेटायला जाण्यासाठी तो वारंवार आपल्या पत्नीच्या माहेरी ये जा करीत असतो. आपल्या आईच्या मरणाने त्याची पत्नी अतिशय दु:खी झालेली असते. ती स्वतःची काळजी बरोबर घेत नाही. ती सहा महिन्यांची गर्भवती असते पण स्वतःवर होत असलेल्या दुर्लक्षपणामुळे तिचं बाळ दगावते. त्यामुळे ती आणखी उदास राहायला लागते. तिचा पती आपल्या पत्नीची काळजी घेतो. काही काळानंतर ती परत एकदा आपल्या वडिलांकडे आपल्या जाऊ बरोबर जाते. तिथे तिचे आणि तिच्या जाऊचे दोन - दोन शब्दांसाठी वाद होते. तिची जाऊ तिला नको ते बोलते आणि ते तिच्या मनाला लागते. भांडणामुळे ती फार दुखावल्या जाते. आपल्या मनातील भावना ती आपल्या पतीशी बोलून दाखवू शकत नाही. आधी आपल्या आईचे निधन नंतर आपल्या बाळाचे निधन आणि घरात होत असलेले हे भांडण यामुळे ती अधिकच उदास होते. एक दिवस तिचा पती तिला तिच्या वडिलांच्या घरी भेटायला येतो त्यावेळेस ती या सर्व गोष्टी त्याच्याजवळ बोलून दाखवते आणि भावविवश होऊन रडते. त्यालाही त्याच्या घरी त्याच्या कुटुंबामध्ये इतर व्यक्तीकडून आधार मिळत नसतो. तो आपल्या पत्नीवर प्रेम करत असतो. त्याला घरात इतरांकडून पाहिजे तशी वागणूक मिळत नसते त्या दोघांनाही प्रेमाची, आपुलकीची आणि आधाराची आवश्यकता असते परंतु परिस्थितीमुळे त्यांना वेगवेगळे राहून आपले घर सांभाळावे लागते आणि आपली जबाबदारी पूर्ण करावी लागते. वसुधाला आपल्या वडिलांना सांभाळावे लागते तर नोकरीमुळे पतीला आपल्या घरी राहावे लागते यामुळे ते दोघे वेगवेगळे राहत असतात. अशा परिस्थितीमध्ये त्यांना दोघांना एकमेकांच्या आधाराची आवश्यकता असते. त्यासंबंधी ते तसे एकमेकांना बोलून दाखवतात. आपल्या भावना व्यक्त करतात आणि परिणामी नंतर एकमेकांचा आधार मिळविण्यासाठी ते एकत्र येतात. प्रस्तुत कथेमध्ये मनोहर तल्हार यांनी पती-पत्नीच्या कौटुंबिक जीवनातील समस्यांचे वर्णन केले आहे.

यानंतरची कथा म्हणजे 'कोलमडलेला' ही होय. या कथेमध्ये तब्येतीने खंगलेल्या गोपाळ या पात्राचे वर्णन येते. तो शिवणकाम करायचे काम करतो. घर खर्च भागत नसल्यामुळे त्याची पत्नी दुसऱ्यांच्या घरी घरकाम करायला जाते. गोपाळ चे वडील सर्वसाधारण असले तरी त्यांची आर्थिक स्थिती बरी असते. गोपाळची तब्येत ठीक नसूनही ते गोपाळला आर्थिक मदत करीत नाही. उलट ते गोपाळच्या पत्नीला बाहेरचे घरकाम करायलाही मनाई करतात परंतु आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे गोपाळच्या पत्नीला त्यांच्या



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

विरोधात जाऊन ते काम करावेच लागते. तब्येत ठीक नसूनही गोपाळ आपले शिवणकाम करतो परंतु तब्येत जास्त झाल्याने त्याला काही काळानंतर तेही काम होत नाही. तो काही काळ चपराशी म्हणून काम करतो त्यावेळेस त्याची आर्थिक स्थिती सुधारते परिणामी औषध पाण्याची काळजी घेतल्यामुळे त्याची तब्येतही सुधारते. परंतु नगरपालिकेमध्ये होत असलेल्या राजकारणामुळे त्याची नोकरी जाते. त्यानंतर तो नोकरी शोधण्याचा खूप प्रयत्न करतो पण त्याच्या तब्येतीमुळे त्याला योग्य अशी नोकरी मिळत नाही. नंतर त्याला घरी बसून आपल्या पत्नीच्या भरवशावर रहावे लागते. पत्नीने कमविलेल्या पैशावरच समाधान मानावे लागते. त्याला त्याच्या औषधांसाठी सुद्धा पैसे त्याच्या जवळ राहत नाही. त्याची पत्नीही आर्थिक परिस्थितीमुळे कावुन जाते. हाती काम आणि पैसे दोन्ही नसल्यामुळे तो फार विवंचनेत असतो. त्याची पत्नी त्याला काय हवे नको ते सर्व बघते परंतु परिस्थितीमुळे ती त्याची पाहिजे तशी काळजी घेऊ शकत नाही. खराब तब्येतीमुळे तो आपल्या वडिलांना औषधांसाठी पैसे मागतो तर त्याचे वडील त्याला पैसे द्यायला मागेपुढे बघतात. शेवटी खराब तब्येतीमुळे आणि औषधांची सोय न झाल्यामुळे गोपाळ चा मृत्यू होतो. त्यानंतर त्याचे वडील आणि त्याचा भाऊ खूप पश्चाताप करतात. आपण आपल्या मुलाची, भावाची काळजी घेतली नाही याचे त्यांना फार दुःख होते पण आता वेळ निघून गेलेली असते. गोपाळ मृत्युमुखी पडला असतो. याप्रकारे गरीब हालाखीच्या परिस्थितीतील दांपत्यांचे चित्रण या कथेमध्ये केलेले आहे. तब्येतीने अतिशय खंगलेल्या, समाजाने वाळीत टाकलेल्या आणि आर्थिक विवंचनेतील गोपाळ चे हृदयदारक चित्रण या कथेमध्ये येते.

मनोहर तल्हार यांच्या 'नि:संग' या कथासंग्रहातील शेवटची कथा म्हणजे 'उद्‌ध्वस्त' ही होय. प्रस्तुत कथेमध्ये काशिनाथ वाघ नावाचे पात्र येते. एकाच गावात राहणाऱ्या दोन व्यक्तींची ही कथा आहे. या कथेतील हे दोन्हीही पात्र एकाच गावातील असल्यामुळे यांना एकमेकांची तोंडओळख असते परंतु हे दोघेही एकमेकांना चांगल्या प्रकारे ओळखत नसतात. त्यांच्यामध्ये मैत्री नसते. त्यांना एकमेकांबद्दल कसलीही कल्पना नसते अशातच एक दिवस काशिनाथ वाघ त्यांच्याकडे येतो आणि आपल्या पत्नीच्या डोळयांचे ऑपरेशन झाले असून वाताहती दरम्यान चोराने त्याचा खिसा कापल्याचे तो सांगतो. आणि घरी परत जाण्याकरिता तिकिटीचे पैसे नाही असे म्हणून त्याच्याकडे पैसे उधार मागतो. याआधी त्याने कित्येक लोकांना पैसे उधार दिले होते परंतु एकानेही त्याचे उधारीचे पैसे परत केले नव्हते. पैशासंबंधी त्याला अतिशय वाईट अनुभव आलेले असतात पण तरीही त्याला काशिनाथ वाघ विषय सहानुभूतीची भावना निर्माण होते आणि तो त्याला २५ रुपये उधार म्हणून देतो. त्याबरोबरच आपला पत्ता देऊन त्या पत्त्यावर मनीऑर्डर पाठवायलाही सांगतो. आठ दिवसाचं सांगून तीन- चार महिने उलटून सुद्धा काशिनाथ वाघ त्याचे उधारीचे पैसे परत करत नाही. तो एकदा असाच कामानिमित्त अमरावतीला गेला असता तिथे काशिनाथ वाघची त्याच्या घरी विचारपूस करतो. त्याच्याभोवती गर्दी जमते आणि तिथे त्याला माहित पडले की काशिनाथ वाघ हा दोन वर्षापासून तिथे नाही.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

आपल्या मुलाला घेऊन तो कुठेही फिरतो आणि मिळेल त्याला दहा-वीस रुपये मागतो. या प्रकारची माहिती मिळवून तो तिथून निघाला असता त्याला एका ठिकाणी काशिनाथ वाघ आपल्या मुलासह माणसांनी खाऊन फेकलेले उष्टे द्रोण चाटताना दिसतो. याप्रकारे या कथेमध्ये मनोहर तल्हार काशिनाथ वाघची दीनवाणी अवस्था वाचकांसमोर प्रकट केली आहे.

## निष्कर्ष

मनोहर तल्हार यांनी 'नि:संग' या कथासंग्रहामध्ये वेगवेगळे विषय घेऊन कथालेखन केले आहे. तल्हार आपल्या कथेच्या माध्यमातून आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडताना दिसतात. त्यांच्या कथांमध्ये हलके फुलके हास्यविनोद पाहायला मिळते. त्यांच्या कथेतून मैत्री विषयक उदात्त भावना प्रकट होते. मनोहर तल्हार यांची कथा लेखनाची भाषाशैली अतिशय साधी, सोपी आणि सरळ आहे. त्यांच्या कथांमध्ये विदर्भातील वऱ्हाडी भाषेतील संवाद येतात. त्याबरोबरच हिंदी भाषेचेही संवाद येतात. काही ठिकाणी इंग्रजीचेही शब्द येतात. त्यांच्या कथांमध्ये काही ठिकाणी शिव्यांचाही वापर करण्यात आलेला आहे. त्यांच्या कथांमधून कौटुंबिक जाणीवा प्रकट होताना दिसतात. कुटुंबाकवात्सल्याची भावना त्यांच्या कथांमधून येते. त्यांच्या कथांमध्ये भावनेचा ओलावा जाणवतो. अनेक ठिकाणी पात्र चित्रण करताना त्यांनी त्या व्यक्तीचे नखशिखांत वर्णन केलेले आहे. अगदी ती व्यक्ती आपल्या डोळ्यासमोर उभी राहावी असे त्यांचे वर्णन तल्हार करतात. प्रसंग, पात्र, वातावरण याचे अतिशय मार्मिक वर्णन मनोहर तल्हार करतात. बहुदा प्रथम निवेदक शैलीने ते कथालेखन करतात. मानवी मनाचे मनकल्लोळ ते आपल्या लेखणीने अतिशय अचूकपणे हेरतात. त्यांच्या कथांमधून प्रेम विषयक भावनाही प्रकट होताना दिसते. दोन प्रेमीयुगलांचे भावविश्व ते काही ठिकाणी आपल्या कथांमध्ये मांडतात. थोडक्यात पण अतिशय प्रभावीपणे ते आपल्या पात्रांच्या माध्यमातून प्रेमविषय भावना व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या कथांमधील प्रेमीयुगल आपल्या प्रेमविषयक भावना मान्य करतात. आपली प्रेम भावना मान्य करून समाजाच्या सामोरे जाताना दिसतात. तल्हार यांच्या कथांमधील पात्रे ही साधी आहेत. आपल्या मनातील भावना ते स्पष्टपणे समोर मांडताना दिसतात. आपले विचार ते स्पष्टपणे मांडताना दिसतात. व्यक्त होताना कुठलेही आढेवेढे ते घेत नाहीत. परिस्थितीने खंगलेली, दिन, दुबळी अशी असंख्य पात्रे त्यांच्या कथांमधून आपल्याला पाहायला मिळतात. परंतु तरी त्यांच्यामध्ये स्वाभिमान जागा आहे. ते आपल्या परिस्थितीवर शेवटपर्यंत मात करताना दिसतात. परिस्थितीशी झगडततांना दिसतात. अशाप्रकारे जीवन विषयक उद्दत दृष्टिकोन मनोहर तल्हार आपल्या कथांमधून मांडतात.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024
Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

## संदर्भ ग्रंथ

१. तल्हार मनोहर., नि:संग, अनुपम प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९७८.

२. चवरे रा. गो., मराठी कथा: प्रवृत्ती आणि प्रवाह, सुयश प्रकाशन, नवी सांगवी, पुणे, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २०२३

३. त्रिभुवन शैलेश., मराठी कथा: चर्चा आणि चिकित्सा, पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २२ एप्रिल २००६

४. शोभणे रवींद्र., थिंक महाराष्ट्र, मनोहर तल्हार यांच्यामधील माणूस शोधताना Dated on १८ December २०१४.

५. शोभनी रवींद्र.,'माणुस' ची पन्नाशी, http://onlinenews१.lokmat. Dated on १८ December २०२४



Copyright © | JET Network, All Rights Reserved